मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नाते घट्ट : महापौर रवि लांडगे

## घुमान पंजाबच्या 5 दिवसीय अभ्यास दौऱ्यातील संतपीठाच्या सदस्यांचा महानगरपालिकेच्या वतीने सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिख संप्रदायाचा धर्मग्रंथअसलेल्या गुरु ग्रंथ साहिब मध्ये संत परंपरेतील अनेक संतांच्या वाणीसह संत नामदेव यांच्या अभंगांचा समावेश आहे, ही बाब महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नाते घट्ट करणारी आहे. भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देणारा हा सांस्कृतिक वारसा दोन्ही राज्यांना एका सूत्रात बांधतो आणि राष्ट्रीय एकात्मतेचे सुंदर उदाहरण ठरतो. दोन्ही राज्यातील संतांच्या विचारांतून प्रेरणा घेत आपण समाजात ऐक्य, बंधुता आणि सद्भावना अधिक दृढ होत आहे. ही अमूल्य परंपरा जपणे, तिची जोपासना करणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी संतपीठाच्या माध्यमातून घुमान येथील अभ्यास दौरा मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या वतीने संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी वास्तव्य केलेल्या घुमान, पंजाब येथे नुकताच संतपीठाच्या माध्यमातून ५ दिवसीय अभ्यास दौरा पार पडला. या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी १८ सदस्यांचा दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त तथा संतपीठाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप खोत, महापालिकेच्या शिक्षणाधिकारी तथा संतपीठाच्या सचिव संगीता बांगर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, संतपीठच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक हभप राजु महाराज ढोरे, संतपीठाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे, चिंतन समिती सदस्य ज्ञानेश्वर भांगरे, संगीत शिक्षक महेश शेळके, अविनाश भोगील, चंद्रकांत गोसावी,विलास कोकाटे , मराठी शिक्षिका मंगल अंबरे, विज्ञान शिक्षक अर्चना देसाई, सुचेता पुजारी, कला शिक्षिका मुग्धा शिरोडकर, पूर्णिमा इंगळे आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या वतीने संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी वास्तव्य केलेल्या पंजाब घुमान येथे नुकताच संतपीठाच्या माध्यमातून ५ दिवसीय अभ्यास दौरा पार पडला. या अभ्यास दौऱ्यामध्ये महापालिकेचे उपायुक्त संदीप खोत, शिक्षणाधिकारी तथा संतपीठाच्या सचिव संगीता बांगर, संतपीठाच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक हभप राजु महाराज ढोरे, संतपीठाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे यांच्या सह भाषा विषय, समाजशास्त्र विषय, संगीत विषय तसेच कला विषयाच्या शिक्षिका, कार्यालयीन सहाय्यक अनिकेत भरत चासकर व अखिल नवनाथ पोखरकर अभ्यास दौऱ्यात समावेश होता. सदर अभ्यास दौऱ्यादरम्यान घुमान इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बाबा नामदेवजी गव्हर्नमेंट डिग्री कॉलेज, बाबा आया सिंग रिअरकी कॉलेज या ठिकाणी भेटी दिल्या.

घुमान येथील संत नामदेव महाराज मंदिरामध्ये संतपीठाचे संचालक हभप राजू महाराज ढोरे यांचे संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या "तु अगाध वैकुंठनायका | तेरे चरणो मेरा माथा ||" या अभंगावर किर्तन संपन्न झाले. या अभंगाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे सांप्रदायचे दृष्टांत देत अभंगाच्या प्रत्येक चरणाचा अर्थ स्पष्ट केला. संत शिरोमणी नामदेवरायांच्या मंदिरात महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायिक परंपरेनुसार प्रथमच हिंदी किर्तन सेवा पार पडली. या अगोदर घुमान मध्ये संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या मंदिरासमोर 1970 साली हभप ज्ञानेश्वर माऊली देहूकर-पंढरपूर फड यांनी सप्ताह केला होता. त्यानंतर महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायिक परंपरेनुसार प्रथमच मुळ मंदिरातील ही किर्तनसेवा संतपीठाकडे आली आणि ती किर्तन सेवा संतपीठाचे संचालक हभप राजु महाराज ढोरे यांच्या माध्यमातून हिंदी भाषेत किर्तन करून पार पडली.

# मोशीतील श्री नागेश्वर महाराज यांचा 'भंडारा' उत्साहात

## मोशीकरांचे असलेले ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज यांच्या भंडारा उत्सवास सुरुवात झाली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्री नागेश्वर महाराज यांच्या यात्रेनिमित्त शेकडो भाविकांना शाकभाजी, बुंदीचा महाप्रसाद वाटप करण्याची दीडशे वर्षांची परंपरा जपत सोमवारी(दि.१६) रोजी मोशीकरांचे असलेले ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज यांच्या भंडारा उत्सवास सुरुवात झाली. यात्रेच्या पहिल्यास दिवशी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिर प्रवेशद्वार व तपोवन भूमी येथे आकर्षक विद्युत रोषणाई सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. फुलांच्या माळा, रांगोळी काढून सुशोभिकरण करण्यात आले होते. मंदिरापासून अमराईपर्यंत महाराजांच्या पवित्र कलशाची टाळ-मृदुंगाच्या गजरात मिरवणुक काढण्यात आली. यंदा महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच सोमवार (दि.१६) ते बुधवारपर्यंत (दि.१८) या काळात भंडारा, लिलाव, कुस्त्यांचा आखाडा,तिसऱ्या दिवशी काळभैरवनाथ यात्रा उत्सव साजरा होणार आहे. अमराई तपोभूमीत अहोरात्र तेवत राहणारा परमभक्तीचा नंदादीप, भंडारा उत्सवामध्ये शेकडो क्विंटल महाप्रसाद, शाकभाजी घेणारे भाविक असे चित्र सोमवारी पहायला मिळाले.

श्री नागेश्वर महाराजांच्या मूर्तीस सोमवारी (दि.१६) पहाटे देवस्थानचे विश्वस्त आणि ग्रामस्थांच्या शुभहस्ते महाभिषेक करण्यात आला. होम प्रज्वलित झाल्यानंतर महाआरती पुरणपोळी व शाक बुंदीचा नैवेद्य दाखवण्यात आला. संध्याकाळी ढोल-ताशांच्या गजरात महाराजांच्या बिछाण्याची मिरवणूक काढण्यात आली.



### कायदा सुव्यवस्था चोख ठेवण्याचा प्रयत्न

**» एमआयडीसी पोलिस ठाणे भोसरी आणि वाहतूक पोलिसांच्या वतीने मंदिर परिसरात पुणे-नाशिक महामार्गावर संपूर्ण मोशी गावांमध्ये कडेकोट बंदोबस्त करण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीसाठी वैद्यकीय सेवा-सुविधांदेखील उपलब्ध करण्यात आल्या आहेत.**

### यात्रेतील वैशिष्ट्य 'लिलाव'

**» श्री नागेश्वर महाराज यांना अर्पण करण्यात आलेल्या वस्तू, मानाचा विडा, मानाची ओटी, मानाचे लिंबूफळ यांचा यात्रेच्या दुसऱ्या दिवशी लिलाव केला जातो. नागेश्वर महाराज यांचा लिलाव राज्यभर प्रसिध्द आहे. हा लिलाव पाहण्यासाठी भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.**

# धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्यस्मृती जागवण्यासाठी 'बलिदान मास'

## हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे नियोजन, महापौरांसह आजी-माजी नगरसेवकांची बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मरणार्थ दरवर्षी साजरा होणारा बलिदान मास यावेळी १८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने पाळण्यात येणार आहे. तसेच, शिव-शंभू विचारांची पिढी घडवण्यासाठी जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील नवनिर्वाचित नगरसेवक आणि आजी-माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बलिदान मास जनजागृतीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे, महापौर रवि लांडगे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमांचे नियोजन, जनजागृती मोहिमेची रूपरेषा आणि युवकांसाठी प्रेरणादायी उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा झाली.

फाल्गुन अमावस्येला (इ.स. १६८९) संभाजी महाराजांनी मुघल बादशाह औरंगजेबाच्या कैदेत अमानुष छळ सहन करत स्वराज्य आणि धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. संगमेश्वर येथील सरदेसाईंच्या वाड्यात पकडल्यापासून ते भिमा-भामा-इंद्रायणीच्या तीरावर मृत्यूला सामोरे जाण्यापर्यंत त्यांनी दाखवलेले धैर्य व शौर्य आजही प्रेरणादायी ठरते. संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. त्यांनी मुघलांच्या आक्रमणांना प्रतिकार केला आणि छळ सहन करूनही स्वराज्य व धर्माशी तडजोड केली नाही. या त्यागामुळे त्यांना "धर्मवीर" म्हणून गौरवण्यात आले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, युवकांसाठी व्याख्यानमाला, इतिहास स्पर्धा व "धर्मवीर" आदर्शाच्या आधारे त्याग, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रसारित केला जातो. सोशल मीडियावर सत्य इतिहास व सकारात्मक संदेश प्रसारित करण्यावर भर देण्यात येणार आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा महत्त्वाचा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.



### बलिदान मासाचे उद्दिष्ट...

» इतिहासाची जाणीव व राष्ट्रनिष्ठा दृढ करणे. युवकांना शौर्य, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची प्रेरणा देणे. सामाजिक ऐक्य व समाजोपयोगी कार्यांना चालना देणे, असा उद्देश आहे. तसेच, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अभिवादन, व्याख्यानमाला व इतिहासपर कार्यक्रम, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व अन्नदान, विद्यार्थ्यांसाठी निबंध/भाषण स्पर्धा, माहितीपर प्रदर्शने व जनजागृती मोहिमा, व्यक्तिगत आणि सामाजिक आचरण याचा समावेश आहे. दररोज महाराजांना अभिवादन व इतिहास वाचन, व्यसनमुक्त जीवनशैली, शिस्तबद्ध व सुसंस्कृत वर्तन, धर्म आणि राष्ट्राचा आदर राखणे यावर विशेष भर दिला जातो. समाजोपयोगी उपक्रमात सहभाग, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, स्थानिक ऐतिहासिक स्थळांची जतन व स्वच्छता या कामांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मृतीला आपण साजरे करून, युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि समाजोपयोगी भावनेची जाणीव निर्माण करू. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून, प्रत्येक मराठी माणसासाठी प्रेरणास्त्रोत आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नाही, तर तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल.यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# चिंचवड रेल्वे स्थानकाच्या फलाटाची लांबी वाढवण्यास टाळाटाळ

## लांब पल्ल्याच्या गाड्यांना या स्थानकावर थांबा देण्यात आलेला नाही, याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड रेल्वे स्थानकाच्या फलाटाची (प्लॅटफॉर्म) लांबी वाढविण्याचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. परिणामी, लांब पल्ल्याच्या गाड्यांना या स्थानकावर थांबा देण्यात आलेला नाही. याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे प्लॅटफॉर्मची लांबी वाढविण्याच्या कामाला मुहूर्त कधी मिळणार? असा प्रश्न प्रवासी विचारत आहेत.

पुणे आणि लोणावळा या शहरांना जोडणारे महत्त्वाचे स्थानक म्हणून चिंचवड रेल्वे स्थानकाची ओळख आहे. 'अमृत भारत' स्थानक विकास योजनेअंतर्गत २० कोटी ४० लाख कोटी रुपये खर्चून याचा स्थानकाचा पूनर्विकास केला जात आहे. यात दोन लिफ्ट, स्वयंचलित जिने, प्रशस्त प्रतीक्षालय, स्वच्छतागृह, डिजिटल माहितीफलक, रेखांकित केलेली चिन्हे, पदपथ, सुनियोजित पार्किंग उभारण्यात येत आहे. मात्र, स्थानकातील प्लॅटफॉर्मची लांबी 'जैसे थे' ठेवली आहे. स्थानकाचा पुनर्विकास करताना रेल्वे प्रशासनाने भविष्यातील गरजा, नागरिकांच्या मागण्यांचा कोणताही विचार केल्याचे दिसून येत नाही, असा आरोप होत आहे.

फलाटाची लांबी कमी असल्याने चिंचवड रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या थांबविणे शक्य नाही, अशी माहिती रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे 'अमृत भारत' स्थानक विकास योजनेअंतर्गत चिंचवड रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासावर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असले, तरी गाडी पकडण्यासाठी प्रवाशांची फरफट कायम राहणार असल्याची स्थिती आहे.




### काय आहेत अडचणी...

» चिंचवड रेल्वे स्थानकावर सध्या चार फलाट आहेत. यातील एक आणि दोन क्रमांकाच्या फलाटांची (मुंबई ते पुणे लाइन) लांबी १९ डब्यांच्या गाड्या थांबू शकतील एवढीच आहे. तर फलाट तीन आणि चारची (पुणे ते मुंबई लाइन) लांबी २३ डब्यांच्या गाड्या थांबू शकतील एवढी आहे. चिंचवड रेल्वे स्थानकावर नांदेड-पनवेल, सिंहगड एक्स्प्रेस, दौंड-इंदूर, कोयना एक्स्प्रेस आणि साईनगर शिर्डी एक्स्प्रेसला थांबा देण्यात आला आहे. दौंड-इंदूर गाडी २३ डब्यांची आहे. प्लॅटफॉर्मची लांबी कमी असल्यामुळे या गाडीला एकाच प्लॅटफॉर्मवर दोनदा थांबा द्यावा लागत आहे. सर्व एक्स्प्रेसला थांबा देण्यास फलाटाची लांबी अडसर ठरत असल्याचे रेल्वे अधिकारी सांगत आहेत. पण, तरीही फलाटाची लांबी वाढविण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होताना दिसून येत नाही.

> चिंचवड रेल्वे स्थानकावर सर्व एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्याची मागणी आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून करत आहोत. पण, प्रत्येक वेळी फलाटाची लांबी आणि इतर तांत्रिक अडचणी असल्याचे सांगून आमच्या मागणीकडे प्रत्येकवेळी दुर्लक्ष केले जाते. प्रशासनाने तांत्रिक अडचणी दूर करुन सर्व एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांना थांबा द्यावा.
>
> - इकबाल मुलानी, माजी अध्यक्ष, रेल्वे प्रवासी संघटना

# महापालिकेला मिळणार 307 कोटींचा निधी !

## निवडणुकांनंतर नवीन सर्वसाधारण सभा अस्तित्वात; 15 व्या वित्त आयोगाकडील रखडलेले 307 कोटी अनुदान महापालिकेला मिळण्याची शक्यता.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या निवडणुकीनंतर नवीन सभागृह अस्तित्वात आल्याने महापालिकेला १५ व्या वित्त आयोगाकडे रखडलेले तब्बल ३०७ कोटींची अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्राकडून २०२०-२१ ते २०२५-२६ काळासाठी महापालिकेला ८२४ कोटींचे अनुदान मंजूर झाले होते. मात्र, २०२२ पासून लोकनियुक्त सदस्य नसल्याचे कारण देत आतापर्यंत महापालिकेस केवळ ५१७ कोटींची अनुदान देण्यात आले. नवीन सभागृह अस्तित्वात आल्याने हे अनुदान महापालिकेला मिळण्यातील अडचण दूर झाली आहे.

महापालिकेला मंजूर झालेला निधी मिळावा, यासाठी महापालिका प्रशासनाने नगरविकास विभागाच्या माध्यमातून प्रयत्न देखील केले होते. मार्च महिन्यात हा ३०७ कोटी रुपयांचा निधी महापालिकेला मिळण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने महापालिकेला निधी मंजूर केला त्यावेळी महापालिकेचे मुख्य सभागृह अस्तित्वात होते. मात्र, मार्च २०२२ मध्ये सभागृहाची मुदत संपली. इतर मागासवर्गीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे पुणे महापालिकेसह राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या.

महापालिकेत लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याचे कारण पुढे करून केंद्राकडून महापालिकेला मिळणारे हे अनुदान थांबविण्यात आले होते. आता निवडणुका पूर्ण होऊन महापालिकेची सर्वसाधारण सभा अस्तित्वात आली असून, दोन बैठका देखील झाल्या आहेत. त्यामुळे अनुदान मिळण्यासाठी असलेला अडसर दूर झाला आहे. हे अनुदान मिळविण्यासाठी प्रशासनाने पुन्हा एकदा केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार सुरू केला आहे.

शहरातील हवा प्रदूषण रोखण्यासाठी ३८१ कोटी ९० लाख, पाणीपुरवठा आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी २५४ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. १५ व्या वित्त आयोगाकडून केंद्राने हा निधी २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीसाठी मंजूर केला आहे. यापैकी प्रत्यक्षात हवा प्रदूषण रोखण्यासाठी आतापर्यंत १६२ कोटी, रुपयांचा निधी मिळालेला असून ११९ कोटी रुपयांचा निधी अद्याप प्रलंबित आहे.

पाणीपुरवठा सुधारणांसाठी आतापर्यंत २५४ कोटी रुपयांचा निधी मिळाला असला, तरी आणखी १८८ कोटी रुपयांचा निधी मिळालेला नाही. निवडणुका रखडल्याने हा निधी मिळण्यास अडचणी येत होत्या. मार्च २०२६ पर्यंत निधी मिळण्याची मुदत असल्याने महापालिकेने यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. तातडीने याचा प्रस्ताव तयार करून केंद्राकडे पाठविला जाणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले. मार्च महिन्यात हा निधी मिळण्याची शक्यता असून, यामुळे विकासकामांना चालना मिळेल, असेही पृथ्वीराज यांनी स्पष्ट केले.




### विभागनिहाय मंजुरी

- हवा प्रदूषण नियंत्रणासाठी – ३८१.९० कोटी रुपये मंजूर.
- मिळालेले – १६२ कोटी रुपये.
- प्रलंबित – ११९ कोटी रुपये.
- पाणीपुरवठा व घनकचरा व्यवस्थापनासाठी – २५४.७९ कोटी रुपये मंजूर.
- मिळालेले – २५४ कोटी रुपये.
- प्रलंबित – १८८ कोटी रुपये.

### एकूण मंजूर निधी (२०२०-२१ ते २०२५-२६)

- केंद्र सरकारकडून एकूण ८२४ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर.
- मार्च २०२२ पर्यंत नियमित वितरण सुरू होते.
- सभागृहाची मुदत संपल्यानंतर निधी वितरणात अडथळा.

### प्रत्यक्ष मिळालेला व प्रलंबित निधी

- आतापर्यंत मिळालेले अनुदान – ५१७ कोटी रुपये.
- रखडलेला निधी – ३०७ कोटी रुपये.
- लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याचे कारण देत निधी रोखला

# पुण्यातील काँग्रेस भवन राडाप्रकरणी भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांवर गुन्हे

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ भाजपच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेस भवन परिसरात रविवारी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलन केले. झटापट, तसेच दगडफेक केल्याची घटना घडल्यानंतर या प्रकरणी भारतीय जनात पक्ष, काँग्रेस कार्यकर्त्यांनी परस्पर विरोधी फिर्यादी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल केल्या. परस्परविरोधी फिर्यादीनंतर भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, तसेच काँग्रेसचे पदाधिकारी नगरसेवक अरविंद शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी काँग्रेस भवनसमोर आंदोलन केले. सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेध केला. या वेळी भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. दोन्ही बाजूच्य कार्यकर्त्यांनी दगडफेक केली.

त्यानंतर रात्री उशीरा भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, युवा मोर्चाचे पदाधिकारी दुष्यंत मोहोळ यांच्यासह ५० ते ६० कार्यकर्त्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत काँग्रेसच्या कार्यकर्त्या प्राची नितीन दुधाणे (वय ४२, रा. दुधाणेनगर, कर्वेनगर) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमर काळंगे करत आहेत.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी पुनीत श्रीकांत जोशी (वय ३५, रा. आयडियल कॉलनी, कोथरूड) यांनी परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, काँग्रेसचे पदाधिकारी अरविंद शिंदे, गौरव बाळंदे, अक्षय जैन, सागर धाडवे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक संजय पांढरे तपास करत आहेत.




### दोन्ही बाजूंविरुद्ध गुन्हा दाखल

- या घटनेत काँग्रेसचे तीन, तसेच भाजपचे दोन असे पाच कार्यकर्ते किरकोळ जखमी झाले. दोन पोलीस कर्मचारी, दोन पत्रकार किरकोळ जखमी झाले, अशी माहिती सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली. या प्रकरणात दोन्ही बाजूंविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी स्पष्ट केले होते.

# पुण्यात ड्रोन अन् खाद्यप्रक्रिया क्लस्टर

## राज्यातील पहिलाच उपक्रम, भोसरी, हडपसरमध्ये सुरू होणार प्रकल्प, उद्योजकांना नवे संधीचे दार

**पुणे | प्रतिनिधी**

औद्योगिक क्षेत्राला नवे बळ देणारे महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुण्यात साकारण्यात येत आहेत. ड्रोन क्षेत्राला चालना देण्यासाठी राज्यातील पहिला ड्रोन आणि खाद्यप्रक्रिया उद्योगासाठी अद्ययावत सामाईक सुविधा केंद्र (क्लस्टर) उभारण्यासाठी 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रिकल्चर' (एमसीसीआयए)ने पुढाकार घेतला आहे.

ड्रोन आणि खाद्यप्रक्रिया या दोन्ही क्लस्टरमुळे पहिल्या टप्प्यात सुमारे २०० सूक्ष्म, लघु उद्योजकांना थेट फायदा होऊ शकतो. त्या दोन्ही क्षेत्रातील उद्योगांना आणि त्यांच्या पुरवठा साखळीतील पूरक उद्योगांना चाचणी सुविधा, संशोधन आणि विकास आणि प्रारूप आराखडा आणि बाजारपेठेत विक्रीपूर्वी सुरुवातीचे उत्पादन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध होईल. त्यामुळे ड्रोन आणि खाद्यप्रक्रिया उद्योग क्षेत्रामध्ये पहिले पाऊल टाकण्याची उमेद उद्योजकांना मिळेल आणि याद्वारे रोजगारनिर्मितीलाही हातभार लागणार आहे.



### ड्रोन क्लस्टरमध्ये नेमके काय होणार?

» ड्रोन क्लस्टरमध्ये ड्रोन आणि त्याच्या सुट्या भागांसाठी आवश्यक असे आरेखन (डिझाईन), संशोधन, चाचणी आणि संबंधित तंत्रज्ञानाशी निगडित उद्योगांना एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध होतील. 'एमसीसीआयए'च्या पिंपरी औद्योगिक वसाहतीमधील शाखेत यासाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. संरक्षण, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, सर्वेक्षण आणि वाहतूक ड्रोनचा वाढता वापर लक्षात घेता या क्लस्टरमुळे राज्यातील ड्रोन क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळणार आहे.

दोन्ही क्लस्टरचे अहवाल तयार करून ते राज्य शासनाच्या उद्योग खात्याकडे मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे. त्यानंतर केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाची अंतिम मंजुरी, निधी वितरण, प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी निविदाप्रक्रिया, सॉफ्टवेअर, कामकाजासाठी मनुष्यबळ आणि आवश्यक त्या मार्गदर्शनासाठी तज्ज्ञांची निवड असे टप्पे पूर्ण करत यात अंतिम मंजुरी मिळेल.

भोसरीत औद्योगिक वसाहतींमधील अनेक सूक्ष्म आणि लघु उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर एकाच ठिकाणी सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटीपी) प्रस्तावित होते. मात्र, त्यासाठीचे सर्वेक्षण झाल्यावर ती जागा अपुरी पडेल हे संबंधित यंत्रणांना लक्षात आले. त्यामुळे हे केंद्र अन्यत्र स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड भोसरी परिसरातील उद्योगांना अधिक परिणामकारक सेवा आणि सामाईक सुविधा देण्यासाठी 'एमसीसीआयए'ने महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे त्या जागेची मागणी केली आहे

### मार्च २०२७ अखेरपर्यंत सुरू होणार

» एमएसएमई-सीडीपी योजनेंतर्गत १० कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पाच्या खर्चातील बहुतांश वाटा (सुमारे ९५ टक्के) केंद्र आणि राज्य शासनाकडून वितरित होणार आहे. साधारणपणे ३० कोटी रुपयांपर्यंतच्या या प्रकल्पात राज्य आणि केंद्र शासनाचा एकत्रित वाटा कमीत कमी ७० टक्के असू शकतो. मार्च २०२७ अखेरपर्यंत हे दोन्ही क्लस्टर कार्यान्वित होणार आहे.

### अशी आहे संकल्पना

» हडपसर येथील मराठा चेंबरच्या कार्यालयात साकारण्यात येणारे हे केंद्र कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी एकात्मिक सुविधा केंद्र असेल. गुणवत्ता तपासणी आणि निर्यातीसाठी प्राथमिक चाचणी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, सूक्ष्म व लघुउद्योग आणि स्टार्टअप्स यांना या क्लस्टरचा थेट फायदा होणार आहे.

"या प्रस्तावांसाठीची कागदपत्रे लवकरच पूर्ण करून लवकरच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग खात्याकडे प्रस्ताव सादर करू. मार्च २०२७पर्यंत दोन्ही प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

- प्रशांत गिरबने, महासंचालक, एमसीसीआयए

# जुन्नरमध्ये चौथी शिवनेरी मॅरेथॉन उत्साहात पार

## शिवजयंतीनिमित्त किल्ले शिवनेरी परिसरात देश-विदेशातील हजारो धावपटूंचा सहभाग; साहिल बिबवे व भाग्यश्री भंडारी विजेते

**पुणे | प्रतिनिधी**

शिवजयंती महोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत, थरार, रोमांच आणि प्रचंड जिद्द या सर्वांचा सुरेख संगम घडवत जुन्नरच्या निसर्गरम्य वातावरणात रविवारी (दि.15) चौथी शिवनेरी मॅरेथॉन उत्साहात पार पडली. यात देश-विदेशातील हजारो धावपटूंनी सहभाग घेतला होता.




शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन, मोरडे फूड्स आणि पोल्ट्री बिडर्स कोऑर्डिनेशन कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवनेरी मॅरेथॉनचे आयोजन केले होते. या स्पर्धेत भारतीय स्पर्धकांत 21.1 किलोमीटर पुरुष गटात साहिल बिबवे तर महिला गटात भाग्यश्री भंडारी हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर केनियाचा चेरुय्योट टू हा 73 मिनिट 31 सेकंद वेळ नोंदवत सर्वाधिक वेगवान खेळाडू ठरला.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून मॅरेथॉनला प्रारंभ झाला. 5, 10 व 21.1 किलोमीटर या तीन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी आयोजित या स्पर्धेचे उद्‌घाटन शिवजन्मभूमीचे माजी आमदार अतुल बेनके, नागपूर परिमंडळचे माजी पोलिस महासंचालक डॉ. दिलीप पाटील भुजबळ, मोरडे फूड्सचे हर्षल मोरडे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांच्या हस्ते झाले.

या 21.1 किलोमिटर हाफ मॅरेथॉनमध्ये साहिल बिबवे याने 78 मिनिट 8 सेकंद, तर भाग्यश्री भंडारी हेने 93 मिनिट 7 सेकंद ही वेळ नोंदवली. दहा किलोमिटर अंतर गटात पुरुषांत स्वप्निल डोंगरे 36 मिनिट 31 सेकंद तर महिलांमध्ये साक्षी भंडारी 41 मिनिट 51 सेकंद वेळ नोंदवून पहिले आले. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

### धावपटूंचा अनोखा पाहुणचार

» मॅरेथॉनमध्ये काही स्पर्धकांनी आपल्या अनोख्या वेशभूषेने लक्ष वेधून घेतले. नऊवारी साडी, मावळा, वारकरी अशा वैविध्यपूर्ण वेशभूषांमध्ये स्पर्धकांनी सहभाग घेतला. संबळ, ढोलताशे, लेझीम या पारंपरिक वाद्यांनी वातावरणात आणखी रंग भरले. अनेक धावपटूंनीही वाद्यांवर ठेका धरत आनंद व्यक्त केला. तर ज्वारीपासून तयार केलेले नाश्त्याचे पदार्थ, थेट शेतातून धावपटूंना ताजे द्राक्ष, स्ट्रॉबेरी, केळी, चिक्की आदी खाद्यपदार्थ उपलब्ध करून दिले. फिजिओथेरपी डॉक्टरांचे पथकासह धावपटूंच्या मदतीसाठी 400 हून अधिक स्वयंसेवक तैनात होते. जुन्नरकरांनी केलेल्या या पाहुणचाराने धावपटू भारावून गेले.